## III) पंतप्रधान -

### I] प्रस्तावना -

भारताने संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. संसदीय शासनव्यवस्थेमध्ये शासनाचे दोन प्रमुख असतात. एक वास्तविक व एक नाममात्र. भारताचा राष्ट्रपती हा शासनाचा नाममात्र प्रमुख आहे. तर पंतप्रधान हा वास्तविक प्रमुख आहे. पंतप्रधान या पदाचा स्विकार इंग्लंडकडून करण्यात आलेला आहे. इंग्लंडमध्ये पंतप्रधानाचे पद योगायोगाने अस्तित्वात आले आहे. 1714 मध्ये हॅनोवर वंशाचा राजा जॉर्ज प्रथम इंग्लंडच्या राज्याच्या गादीवर आला. जॉर्ज प्रथमला इंग्लंडमधील चालिरीती, रुढी-परंपरा यांची माहिती नव्हती. तसेच इंग्रजी भाषा बोलता येत नव्हती. त्यामुळे तो मंत्रीमंडळाची बैठक घेण्याचे टाळू लागला. हे जेव्हा मंत्र्यांच्या लक्षात आले तेव्हा मंत्र्यांनी आपल्यामधील एका बुद्धिमान, कर्तृत्ववान व्यक्तीला म्हणजेच रॉबर्ट क्लाईव्हला मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नेमले. तेव्हापासून रॉबर्टचा उल्लेख ~~प्र~~ Prime Minister असा केला, व पंतप्रधानाचे पद इंग्लंडमध्ये अस्तित्वात आले.

भारतीय संविधानाच्या कलम 74 नुसार राष्ट्रपतीला राज्यकारभारात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल असा उल्लेख करण्यात आला आहे.

### II] पंतप्रधानाची रचना -

#### i) नियुक्ती -

पंतप्रधानाची नियुक्ती राष्ट्रपती करतो. परंतु ही नियुक्ती औपचारिक स्वरुपाची आहे. कारण लोकसभेमध्ये ज्या पक्षाला बहुमत प्राप्त झाले आहे त्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधान म्हणून नेमले जाते. लोकसभेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्यास राष्ट्रपती

वापर करून लोकसभेत ज्या पक्षाला जास्त जागा आहेत, त्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधानपदी नेमतो. व एका विशिष्ठ मुदतीमध्ये बहुमत सिद्ध करण्यास सांगितले जाते.

ii) पात्रता -
भारतीय संविधानात पंतप्रधानाची पात्रता सांगण्यात आलेली नाही. परंतु तो संसदेचा सदस्य असला पाहिजे. नसल्यास 6 महीन्याच्या आत त्याने संसदेचे सदस्यत्व स्विकारले पाहिजे. उदा. 1996 मध्ये एच. डी. देवगौडा कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसताना पंतप्रधान झाले होते. नंतर त्यांनी राज्यसभेचे सदस्यत्व स्विकारले.

iii) कार्यकाल -
पंतप्रधानाचा कार्यकाल साधारणतः लोकसभे एवढा म्हणजेच 5 वर्षांचा आहे. मंत्रीमंडळ अल्पमतात आल्यास किंवा अविश्वासाचा ठराव संमत झाल्यास पंतप्रधानास मुदतपूर्व राजीनामा द्यावा लागतो.

iv) शपथविधी -
पंतप्रधानाला राष्ट्रपतीद्वारे शपथविधी दिली जाते.

v) राजीनामा व पदच्युती -
कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर पंतप्रधानास स्वच्छेनुसार राष्ट्रपतीकडे राजीनामा देता येतो. अविश्वासाचा ठराव संमत झाल्यावर पंतप्रधानास आपल्या पदापासून दूर जावे लागते.

vi) वेतन व भत्ते -
पंतप्रधानास मासिक 1 लाख रु वेतन, इतर भत्ते, निशुल्क निवास, प्रवास, इ. अनेक सुखसोई शासनाद्वारे पुरविले जातात.

DACL

iii) पंतप्रधानाची अधिकार व कार्य

1) मंत्र्याची नियुक्ती करणे -

पंतप्रधानाची नियुक्ती झाल्यास मंत्रीमंडळातील मंत्र्याची यादी तयार करुन राष्ट्रपतीकडे सादर केली जाते. राष्ट्रपती औपचारिकरित्या मंत्र्याना शपथ देतो. प्रत्यक्षात पंतप्रधानालाच जात, धर्म, भाषा, भुप्रदेश इ. विचार करुन मंत्र्याची नियुक्ती केली जाते.

2) मंत्र्यामध्ये खातेवाटप करणे -

मंत्रीमंडळातील मंत्र्याची नियुक्ती झाल्यास खातेवाटप करण्याचे कार्यही पंतप्रधानालाच करावी लागते. कोणते खाते कोणत्या मंत्र्याला दयायचे, किती खाते दयायचे, तसेच मंत्रीमंडळातील मंत्र्याची संख्या ठरविण्याचा अधिकार पंतप्रधानास आहे.

3) मंत्रीमंडळाचा प्रमुख म्हणून कार्य -

पंतप्रधान हा मंत्रीमंडळाचा प्रमुख असतो. पंतप्रधान हा मंत्रीमंडळाचा आत्मा आहे. पंतप्रधानाने राजीनामा दिल्यास मंत्रीमंडळ विसर्जित होते. मंत्रीमंडळाची बैठक बोलावणे, बैठकीचे अध्यक्षस्थान स्विकारणे. मंत्र्याना मार्गदर्शन करणे, मंत्रीमंडळावर नियंत्रण ठेवणे इत्यादी विविध प्रकारचे अधिकार मंत्रीमंडळाचा प्रमुख या नात्याने पंतप्रधानास प्राप्त झाले आहे.

4) राष्ट्रपती व मंत्रीमंडळातील दुवा -

पंतप्रधान हा राष्ट्रपती व मंत्रीमंडळातील दुवा किंवा मध्यस्त आहे. प्रत्येक मंत्री राष्ट्रपतीला भेटणे शक्य नाही, त्यामुळे मंत्रीमंडळाची मते, भुमिका राष्ट्रपतीपर्यंत पोहचाविण्याचे काम पंतप्रधानाद्वारे केले जाते.

5) लोकसभा / संसदेचा नेता -

पंतप्रधान हा लोकसभेचा नेता असतो. संसदेचे अधिवेशन बोलावणे. अधिवेशनाचा कालावधी ठरवणे, लोकसभेच्या मुदतपूर्व विसर्जनाचा राष्ट्रपतीला सल्ला देणे, कायदेमंडळात विचारलेल्या प्रश्नाचे समर्थक उत्तर देणे, इ. कार्य त्यांना करावी लागतात.

6) बहुमतवाल्या पक्षाचा नेता -

पंतप्रधानाला आपल्या पक्षाचे नेतृत्व करावे लागते. पक्षाचा नेता म्हणून पक्ष संघटना मजबूत करणे, पक्षातील आपापसातील वाद दूर करणे, निवडणुकीचा कार्यक्रम तयार करणे, जाहीरनामा तयार करणे, प्रचार यंत्रणा आखणे, निवडणुकीसाठी फंड गोळा करणे, निवडणुकीमध्ये उमेदवार उभा करणे इ. अनेक कामे बहुमतवाल्या पक्षाचा नेता म्हणून पंतप्रधानास करावी लागतात.

DACE

7) राष्ट्राचा किंवा देशाचा नेता -

संपूर्ण देशाचे नेतृत्व पंतप्रधानाकडे असते देशाच्या विकासासाठी, संरक्षणासाठी, शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी, देशामध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी पंतप्रधानास कार्य करावे लागते.

8) नेमणुकीबाबत सल्ला देणे -

देशातील महत्त्वाच्या पदावरील व्यक्तीच्या नेमणुका करण्याचा अधिकार राष्ट्रपतीने संविधानाने राष्ट्रपतीला दिलेला असला तरी प्रत्यक्षात राष्ट्रपतीला सल्ला देण्याचे काम पंतप्रधानाद्वारेच केले जाते. मंत्री, राज्यपाल, न्यायाधीश, इत्यादीच्या नेमणुकीबाबत पंतप्रधानाची भुमिका महत्त्वाची असते.

9) परराष्ट्र धोरण ठरविणे -

पंतप्रधान हा परराष्ट्र धोरणाचा शिल्पकार असतो. परराष्ट्र धोरण ठरविणे, युद्धाची घोषणा करणे

तह-करार करणे, परराष्ट्राशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे, आंतरराष्ट्रीय परिषदा / बैठकीमध्ये देशाचे नेतृत्व करणे इत्यादी कार्यही पंतप्रधानास पार पाडावी लागतात.

10) पदव्या देणे-

देशामध्ये विविध क्षेत्रामध्ये चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तीला गुण गौरवार्थ राष्ट्रपतीद्वारे पदव्या दिल्या जातात. राष्ट्रपतीला कोणत्या व्यक्तीला कोणती पदवी द्यावी याचा सल्ला पंतप्रधान देत असतो. भारतरत्न, कृषी मंत्री, पद्मभूषण, आदर्शशिक्षक इ. अनेक पदव्या देताना पंतप्रधानाची भुमिका महत्वाची असते.

इ. विविध प्रकारचे अधिकार व कार्य पंतप्रधानास पार पाडावी लागतात.

पंतप्रधानाचे स्थान-

भारतीय राजकारणात पंतप्रधानाचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण आहे. शासनाचा वास्तविक प्रमुख म्हणून पंतप्रधानाचा उल्लेख केला जातो. संविधानाने राष्ट्रपतीला अधिकार दिले असले तरी वास्तव्यात त्याचा वापर पंतप्रधानाद्वारेच केला जातो. एखाद्या खेळामध्ये कॅप्टनचा जसा दर्जा असतो तसे शासनामध्ये पंतप्रधानाचा असतो. तो मंत्रीमंडळाचा निर्माता, संरक्षणकर्ता जीवनदाता असल्यामुळे मंत्रीमंडळरुपी नावेचा नावाडी म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. तसेच चांदण्यातील चंद्राची उपमाही पंतप्रधानाला दिली जाते. डॉ. आंबेडकरांच्या मते, पंतप्रधान मंत्रीमंडळरुपी कमानीचा आधारभूत शीला आहे. लॉर्ड मोरलेनी यांनी पंतप्रधानास समानांत मध्यशिला प्रथम असा दर्जा दिलेला आहे. इ. अनेक उदाहरणावरुन पंतप्रधानाचे स्थान अत्यंत महत्वाचे असल्याचे दिसून येते.